पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, एप्रिल २०२१, खंड २०, अंक १, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● शेजार

५ ● सुवर्णमहोत्सवी 'शोनार बांगला'

११ ● वाढते तापमान जलचरांच्या मुळावर

१५ ● मनःस्वास्थ बिघडवणारा 'कोविड'ताण

१९ ● समस्या वाढत्या बालमजुरीची...

२५ ● पाणी जपणारे एक गाव


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.



वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड २० (अंक १) एप्रिल २०२१**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# शेजार

इतिहासाची पुनरावृत्ती होत असते, असे म्हणतात ते काही खोटे नाही. दुस-या महायुद्धानंतरचा विस्तीर्ण कालखंड व्यापलेला होता अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत संघराज्यादरम्यान धुमसणा-या शीतयुद्धाने. १९८९ साली सोव्हिएत संघराज्याच्या घडून आलेल्या विघटनानंतर जगाचा सत्तातोल बनला एककेंद्री. अमेरिका हे राहिले त्या एककेंद्री वैश्विक व्यवस्थेचे निर्विवाद केंद्रस्थान. साधारणपणे १९७७-७८ सालापासून आर्थिक आघाडीवर कात टाकण्यास योजनाबद्ध रीतीने सुरु वात केलेल्या चीनने त्यांपुढील एक ते दीड तपाच्या काळात प्रचंड आर्थिक व लष्करी सामर्थ्य संपादन करत एक पर्यायी सत्ताकेंद्र म्हणून वैश्विक सत्तातोलात आपला दबदबा प्रस्थापित केला. प्रथम दक्षिण आशियामध्ये आणि मग यथावकाश जागतिक नकाशावर सर्वसमर्थ सत्ता म्हणून आपले स्थान निर्माण करण्याचे चीनचे मनसुबे गेल्या तीन ते साडेतीन दशकांदरम्यान क्रमाने प्रगट होत राहिलेले आहेत. चीनच्या त्या आगेकूचीला पायबंद घालण्याचा निकराचा प्रयत्न केला अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी. चीनविरोधात व्यापारी युद्धाची आघाडीच उघडली त्यांनी जणू. ट्रम्प यांच्याकडून अमेरिकी सत्तेची सूत्रे हाती घेतलेल्या बायडेन यांनी अजून तरी चीनच्या विरोधात कोणतीही आक्रमक अथवा ठाम भूमिका घेतलेली नसली तरी चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यान शीतयुद्धसदृश ताण नांदतो आहे, हे वास्तव आजमितीस कोणीच नाकारणार नाही. २०१९ सालातील नोव्हेंबर महिन्यापासून उभ्या जगाच्या मानगुटीला बसलेल्या 'कोविड १९' या विषाणूच्या निपजेस कारणभूत ठरल्याचा वहीम माथ्यावर बाळगणारा चीन आज सगळ्यांच्याच संशयाचा विषय बनलेला आहे. सगळे जग 'कोविड १९'च्या संसर्गापायी उद्भवलेल्या अनेकविध समस्यांचा सामना करण्यात गुंतलेले असताना, दुसरीकडे, चीन मात्र अत्यंत शांतपणे धूर्त पावले टाकत दक्षिण आशियातील आपले वर्चस्व दिवसेंदिवस वाढवतो आहे. परिणामी, दक्षिण आशियातील सत्तासंबंधांमध्ये एक विचित्र तणाव सतत नांदताना दिसतो. अशा सगळ्या परिस्थितीमध्ये, ज्याच्या निर्मितीस ५० वर्षांपूर्वी भारताचा हातभार लागलेला आहे असा सीमेपलीकडील एक शेजारी असणारा बांगला देश स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात करता झालेला आहे. तर, २०२१ सालातील येत्या ऑगस्ट महिन्यापासून भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू होते आहे, हा एक विलक्षण योगायोगच मानावा लागेल.



राजकारणाच्या क्षेत्रात कोणीही कोणाचा कायमस्वरूपी मित्र अथवा शत्रू नसतो, हा जणू अलिखित नियमवजा संकेतच आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये तर या संकेताची प्रचिती अधिकच प्रकर्षाने व सघनपणे येत राहते. देशांतर्गत सत्तास्पर्धेतील ताणतणावांची छाया जशी शेजारी देशांबरोबरील नातेसंबंधांवर पडत राहते त्याचप्रमाणे, सीमेपल्याडच्या देशांमधील नेतृत्वाची ध्येयधोरणे देशांतर्गत राजकारणाचा पोत बदलण्यासही कारणभूत ठरत राहतात. एकीकडे राक्षसी स्वरूपाचे आर्थिक व लष्करी बळ संपादन केलेला चीनसारखा आक्रमक बलदंड आणि लोकशाहीप्रधान असला तरीही, आकारमानाने तसाच प्रचंड असणारा भारत या दोहोंच्या धाकाचे पालाण दक्षिण आशियातील तुलनेने लहान व म्हणूनच दुर्बल असणा-या देशांवर सतत पडलेले असते व आहे. या चक्रातून आजवरची अर्धशतकी वाटचाल पूर्ण केलेल्या बांगला देशातील सद्यःस्थितीचा दूरस्थ आढावा सादर करणारा 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रस्तुत अंकातील लेख वाचकांना उद्बोधक वाटावा अशी आशा आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## आंतरराष्ट्रीय

# सुवर्णमहोत्सवी ‘शोनार बांगला’

बरोबर ५० वर्षांपूर्वी म्हणजे १९७१ साली भारताच्या मदतीने ‘बांगलादेश’ या नव्या राष्ट्राचा उदय झाला. पाकिस्तानने लादलेल्या त्या वेळच्या युद्धात भारतीय सैनिक पूर्व पाकिस्तानातील मुक्तिवाहिनीच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून उतरले आणि त्यांनी पाकिस्तानी सैन्याला पिटाळून लावले. त्या संघर्षाने बांगलादेशला स्वतंत्र देशाचा दर्जा मिळवून दिला. या महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना तेव्हाचा बांगलादेश आणि आताचा बांगलादेश यांत होत गेलेले बदल आणि उभय देशांचे असणारे परस्परसंबंध यांचा वेध घेणे निश्चितच उद्‌बोधक ठरावे. बांगलादेशाच्या स्वतंत्र अस्तित्वास भारताचा हातभार लागला म्हणून राजकीय, सामाजिक, धार्मिक अशा सर्वच पातळ्यांवर भारताला अनुकूल असे धोरण आणि वातावरण बांगलादेशात आजही असेल असे समजून चालण्याचे काही कारण नाही. तेव्हा आणि आताच्या परिस्थितीत गेल्या ५० वर्षांमध्ये कमालीचा फरक पडलेला आहे.

आजचा बांगलादेश अर्थात पूर्वाश्रमीचा पूर्व पाकिस्तान. फाळणीपश्चात सभ्यतेची एक वेगळी परंपरा जपलेला हा प्रांत. १३ व्या शतकाच्या सुरुवातीपासून या प्रदेशात मुघल साम्राज्य प्रस्थापित झाले तेव्हापासून या भागाचा चेहरामोहरा आणि ओळख टप्प्याटप्प्यावर बदलत गेली. मुघल शासकांचे वर्चस्व बंगालवर प्रदीर्घकाळ राहिले. आशियातील एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून १६ व्या शतकामध्ये बंगालची स्वतंत्र ओळख निर्माण झालेली होती. याच शतकात युरोपीय व्यापा-यांच्या पाठोपाठ बंगालमध्ये पाऊल ठेवले ब्रिटिशांनी. ‘ब्रिटिश ईस्ट इंडिया’ कंपनीने आपला दबदबा तिथे वाढवायला सुरुवात केली. ब्रिटिशांनी तिथेच न थांबता हळूहळू संपूर्ण भारतात पाय पसरले आणि आपली हुकूमत प्रस्थापित करून भारताला गुलाम बनवले. पारतंत्र्यामधून १९४७ साली देश स्वतंत्र झाला खरा परंतु त्याची किंमत देशाला फाळणीच्या रूपाने मोजावी लागली. ब्रिटिशांच्या ‘फोडा आणि झोडा’ या कूटनीतीमुळे भारतापासून पाकिस्तान अखेर वेगळा झाला. भारताच्या फाळणीमुळे अनेक नवे प्रश्न जन्माला आले.



देशाचे हे विभाजन होत असताना मुस्लिमबहुल असलेला पूर्व बंगाल हा प्रदेश पाकिस्तानमध्ये गेला आणि फाळणीनंतर तो ‘पूर्व पाकिस्तान’ म्हणून ओळखला जाऊ लागला. बंगालचा हिंदूबहुल असणारा भाग भारतातच राहिला आणि ‘पश्चिम बंगाल’ म्हणून ओळखला जाऊ लागला. भूभागांची विभागणी धार्मिक आधारावर झालेली असली तरी पूर्व पाकिस्तानचा हा भाग पाकिस्तानपासून तुटल्यासारखा वेगळा आणि दूर अंतरावर होता. पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तानमध्ये तब्बल १६०० किलोमीटरचे अंतर होते. पूर्व पाकिस्तानची स्वाभाविकपणे सातत्याने उपेक्षा होत राहिली. येथील लोकांवर अन्याय होत राहिला. पाकिस्तानातील लष्करी आणि राजकीय नेतृत्व हे पूर्व पाकिस्तानला, बंगाली मुस्लिमांना आणि त्यांच्या भाषेला तुच्छ लेखत असत. त्यामुळे पूर्व पाकिस्तान कायमच उपेक्षित राहू लागला. हळूहळू पूर्व पाकिस्तानमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होऊ लागले. पाकिस्तानचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष याह्याखान यांनी अन्यायकारक वागणूक दिल्याने पूर्व पाकिस्तानमधील रोष आणखीनच वाढत गेला. पाकिस्तानपासून आपण अलग व्हावे अशी भावना तिथे जोर धरू लागली आणि या भावनेतूनच स्वातंत्र्याची एक चळवळ तिथे उदयाला आली.

पाकिस्तान विरोधातील असंतोष मोडून काढण्यासाठी पाकिस्तानने पूर्व पाकिस्तानमध्ये लष्कर धाडले आणि बळजबरी करून असंतोष दडपण्याचा प्रयत्न सुरू केला. पूर्व पाकिस्तानात लष्करी कायदा लागू केला. या सगळ्याचा परिणाम आणखीनच विपरित झाला. पाकिस्तानच्या विरोधातील असंतोष उफाळून आला. अन्याय-अत्याचाराने व्यथित झालेल्या आणि तेथील तणावपूर्ण परिस्थितीचा सामना करू न शकलेल्या असंख्य लोकांनी आपली पावले भारताकडे वळवली आणि भारतीय हद्दीत स्थलांतर सुरू झाले. निर्वासितांच्या रूपाने लाखो लोक पश्चिम बंगालमध्ये येऊ लागले. दरम्यान, पूर्व पाकिस्तानातील लोकांवर पाकिस्तानी लष्कराने अनन्वित अन्याय केला. या काळात मोठा हिंसाचार झाला. त्यात सुमारे ३० लाख लोक मारले गेले असावेत, असा अंदाज वर्तवला जातो. या अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी ‘मुक्तिवाहिनी’च्या रूपाने एक सशस्त्र चळवळ उभी राहिली. पाकिस्तानी लष्कराच्या विरोधात तिने दंड थोपटले आणि स्वतंत्र होण्यासाठी एल्गार पुकारला. चिघळत जाणारी परिस्थिती आणि भारतात येणारे स्थलांतरितांचे लोंढे लक्षात घेता भारतालाही त्या सा-याच्या झळा बसू लागल्या. त्यामुळे भारताने जागतिक पातळीवर प्रश्न उपस्थित केला आणि या प्रश्नी हस्तक्षेप करण्याचे आवाहन आंतरराष्ट्रीय समुदायाला केले.

परंतु, त्या संदर्भात पुढे काहीही हालचाल होत नाही असे लक्षात आल्यानंतर या प्रकरणी पुढाकार घ्यायचे भारतानेच ठरवले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आदेशानुसार भारतीय लष्कर युद्धआघाडीवर उतरले. मुक्तिवाहिनीच्या बरोबरीने लढा देत भारतीय लष्कराने पाकिस्तानी लष्कराला पिटाळून लावले. १९७१ साली झालेल्या या युद्धामध्ये पाकिस्तानचा दारूण पराभव झाला आणि पाकिस्तानच्या जोखडातून पूर्व पाकिस्तान मुक्त झाले. भारताच्या मदतीनेच बांगलादेश या स्वतंत्र देशाची निर्मिती अशा प्रकारे झाली.

या सर्व इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता, पाकिस्तानच्या जोखडाखालून मुक्तता प्रदान करून एक स्वतंत्र देश म्हणून बांगलादेशाला स्वायत्त अस्तित्व मिळवून देण्यात भारताचा वाटा मोठा होता हे लक्षात येते. या सर्व प्रक्रियेत निर्णायक अशी भूमिका भारताने बजावलेली असताना त्या पार्श्वभूमीवर बांगलादेशाशी आपले संबंध आजमितीस कसे आहेत हे मात्र पाहणे निश्‍चितच समयोचित ठरावे. बांगलादेशातील अन्यायाच्या विरोधात प्रथमतः भारत धावून गेलेला असतानादेखील आज बांगलादेशात भारतविरोधातील भावना प्रबळ का आहे, भारत-बांगलादेश सीमेवर सातत्याने तणावपूर्ण परिस्थिती का असते आणि हजारो किलोमीटरचा सीमेवरील भाग काटेरी कुंपणांनी का बंदिस्त केलेला आहे, व्यापार, उद्योग, सामाजिक-आर्थिक सहकार्य या आघाड्यांवर भारत-बांगलादेश या दोन्ही देशांत सौहार्दपूर्ण असे नाते का प्रस्थापित झालेले नाही,..असे अनेक महत्त्वाचे प्रश्‍न आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास करणा-या अभ्यासकांकडून उपस्थित केले जात आहेत.

**घुसखोरीची समस्या**

भारतीय लष्कराने पूर्व पाकिस्तानमध्ये कारवाई सुरू केली त्याच दरम्यान इस्लामी कट्टरतावाद्यांचे गट बांगलादेशात जोर धरू लागलेले होते. इस्लामी कट्टरतावाद्यांनी बांगलादेशातील हिंदूंवर सातत्याने अन्याय-अत्याचार करण्याचे सत्र सुरू ठेवले आहे. त्या अत्याचारांना कंटाळून पश्‍चिम बंगाल आणि आसाममध्ये स्थलांतर करणा-या बांगलादेशी नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. चांगली गुजराण होऊ शकेल आणि बांगलादेशापेक्षा अधिक चांगल्या परिस्थितीत आपल्याला जगता येईल या आशेने केवळ हिंदूच नव्हे तर मुस्लिम बांगलादेशीही मोठ्या प्रमाणावर भारतात येऊपाहतात. हे सगळे स्थलांतरित घुसखोरी करतात आणि भारतात बेकायदेशीर रीतीने कायमचे राहू लागतात हे वास्तव अनेकदा उघड झालेले आहे. घुसखोर बांगलादेशींविरोधात आजवर कधीही ठोस



कारवाई झालेली नाही, हेदेखील तितकेच वास्तव आहे. आजघडीला सुमारे सहा कोटी बांगलादेशी नागरिक भारतामध्ये बेकायदेशीररीत्या वास्तव्य करीत असावेत, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. अशा सर्व घुसखोर बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करावी, त्यांना मायदेशात पुन्हा पाठवून द्यावे आणि देशावर येणारा अतिरिक्त ताण कमी करावा, अशी मागणी सातत्याने राजकीय वर्तुळातून होत असते. आपल्या देशातील नागरिक भारतात घुसखोरी करीत असल्याचे बांगलादेशाने मात्र अधिकृतपणाने मान्य केलेले नाही, हीदेखील वस्तुस्थिती आहे.

बांगलादेशातील अंतर्गत राजकारणाच्या केंद्रस्थानी भारतविरोधच आहे. बांगलादेशाचे माजी राष्ट्राध्यक्ष झिया उर रेहमान यांच्या पत्नी व बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षा खलिदा झिया यांचा भारतविरोध तर उघड आहे. बांगलादेशात २००१ ते २००६ या कालावधीत याच पक्षाचे सरकार असल्याने भारत-बांगलादेश संबंध त्या काळात अधिकच अधोगतीला जाऊन परस्परसंबंधांतील कटूताही वाढत गेली होती. पाकिस्तानातील इस्लामी गट आजही बांगलादेशात सक्रीय असून भारतविरोधाची आग सतत धगधगत राहिल याकडे ते लक्ष पुरवित असतात. भारताच्या विरोधात युद्धात झालेला दारुण पराभव पाकिस्तानच्या जिव्हारी लागलेला असल्याने आणि भारतामुळेच बांगलादेश वेगळा झाल्याचा राग खदखदत असल्याने या संघटनांचा भारताविषयीचा आकस अनेक घटनांतून दिसून येतो. भारतातसुद्धा विविध कारणांमुळे असंतोष कसा पसरत राहिल हाच प्रयत्न सातत्याने इस्लामी संघटनांकडून त्यांमुळेच केला जातो असे संरक्षणक्षेत्रातील जाणकारांचा अभ्यास सांगतो.

बांगलादेशासमवेत २०१५ साली ‘लँड बॉर्डर ॲग्रिमेंट’ हा करार झालेला असल्यामुळे आता घुसखोरी रोखणे शक्य होऊ शकेल असा विश्वास जाणकारांकडून व्यक्त केला जातो आहे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देत बांगलादेशी घुसखोर नागरिकांच्या संदर्भात केंद्रसरकारने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदपुस्तिका (एनआरसी) अद्ययावत करण्याचीही घोषणा केलेली आहे. भारताने हे पाऊल उचलल्यामुळे बांगलादेशातून भारतात आलेल्या आणि अवैध रीतीने या देशात वास्तव्य करणा-या नागरिकांची ओळख पटू शकेल असा विश्वास सरकारकडून व्यक्त केला जातो आहे. अर्थात, सरकारची ही भूमिका पारदर्शक नाही, त्यात धर्मानुसार भेदभाव केला जातो आहे, त्यामुळे बांगलादेशी नागरिक जर हिंदूधर्मीय असतील तर त्यांना निर्वासित म्हणून नागरिकत्व बहाल करावे आणि मुस्लिम असल्यास

त्यांना घुसखोर म्हणून हाकलून द्यावे, अशी भूमिका घेतली जात असल्याने बांगलादेशातील मुस्लिम नागरिकांमध्ये भारताविषयीचा रोष वाढला असण्याची शक्यता अभ्यासक वर्तवताना दिसतात.

जे बांगलादेशी हिंदू नागरिक १९७१ सालापासून निर्वासित झाले त्यांच्या जमिनी हडप करण्यात आल्या. या संदर्भात, बांगलादेशातील एक अभ्यासक अब्दुल बरकत यांनी एक अभ्यास केला. त्या नुसार, बहुसंख्य हिंदूंची जमीन बांगलादेशात बळकावली गेली आहे. विशेषतः, सुरुवातीच्या अवामी लीगच्या कारकिर्दीत व त्या नंतर बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या पहिल्या कारकिर्दीत हे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडल्याचे त्यांनी आपल्या अभ्यासात नमूद केले आहे. अल्पसंख्यांक असल्याने या प्रकरणी तेथील हिंदूंना कुठेही दाद मागता आली नाही आणि त्यांच्यावर अन्याय झाला. मुजीब-उर् -रेहमान यांच्यासारख्या दूरदृष्टी असलेल्या मोजक्याच नेत्यांनी बांगलादेशच्या निर्मितीनंतर लोकशाहीवादी व पंथनिरपेक्ष अशा देशाचे स्वप्न पाहिलेले होते. परंतु, दुर्दैवाने कट्टरपंथीयांच्या प्रभावामुळे बांगलादेशाची वाटचाल बरोबर त्याच्याविरु द्ध दिशेने होत गेली. पाकिस्तानातील विविध कट्टर धार्मिक संघटना आणि पाकिस्तानची गुप्तहेर संघटना असलेल्या 'आयएसआय'च्या माध्यमातून भारतातील घुसखोरी सातत्याने वाढत कशी राहील यावर आजही भर दिला जातो.

बांगलादेशात १९४७ साली एकूण लोकसंख्येत हिंदू होते २२ टक्के. ते प्रमाण आज आठ टक्क्यांवर आलेले आहे. बांगलादेशामध्ये 'अवामी लीग' सारख्या पक्षांचे आजही प्राबल्य आहे आणि त्यांची जनमानसावर मोठी पकड आहे. याच पक्षाच्या शेख हसीना यांच्याच नेतृत्वाखाली आज सरकार तिथे कार्यरत आहे. भारतात होणा-या घुसखोरीचे गांभीर्य लक्षात घेता भारतीय सीमांचे व्यवस्थापन अधिक काटेकोर पद्धतीने होणे गरजेचे आहे. त्यासाठी सीमेवर केवळ काटेरी कुंपणे उभारून हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार नाही. त्यासाठी उभय देशांनी मिळूनच या प्रश्नावर एकत्रितपणे तोडगा काढणे गरजेचे आहे, असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. भारत-बांगलादेश सीमा ही आसाम, पश्चिम बंगाल, मेघालय, त्रिपुरा आणि मिझोराम यांना जोडून आहे. त्यामुळे घुसखोरी रोखण्यासाठी या सर्वच सीमांवर काम करणे तसे आव्हानात्मक आहे. या सीमांचा बहुंताश भाग डोंगराळ, घनदाट जंगलांनी आणि ओढ्यांनी व्यापलेला असल्याकारणाने अशा ठिकाणी गस्त घालणे आणि सैनिक नेमून नियमितपणे देखरेख करणेही दुस्तर ठरते.



बांगलादेशातून होणारी घुसखोरी कायमची रोखायची असेल तर लष्कराला गस्त घालण्यासाठी चांगले रस्ते तयार करणे, सीमारेषेवर कुंपण घालण्याचे काम वेगाने पूर्ण करणे आवश्यक आहे. घुसखोरांना रोखण्याच्या प्रयत्नांमध्ये अनेकदा काही मानवतावादी संघटना हरकती घेतात आणि लष्कराच्या कारवाईवर सातत्याने आक्षेप घेतला जातो त्याचीही शहानिशा करून लष्कराला स्वातंत्र्य द्यायला हवे, असे वरिष्ठ लष्करी अधिका-यांचे मत आहे. आजघडीला बांगलादेशी घुसखोरांची संख्या अन्य राज्यांमध्येही वाढत चालली असल्याचे दिसून आले आहे. २०११ सालच्या आकडेवारीनुसार, आसाममध्ये एकूणांत ३४ टक्के तर पश्चिम बंगालमध्ये एकूणांत २७ टक्के बांगलादेशी घुसखोर असल्याचा दावा करण्यात आलेला होता. या घुसखोरांमुळे स्थानिक संस्कृतीचा -हास होतो आणि त्याचबरोबर गुन्हेगारी, बेकायदेशीर शस्त्रांची आयात-निर्यात, अंमली पदार्थांची तस्करी असे गैरप्रकारही वाढत असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

गेल्या काही वर्षांपासून बांगलादेशची अर्थव्यवस्था चांगल्या रीतीने प्रगती करीत आहे. शेजारी राष्ट्र म्हणून बांगलादेशाशी कायमच चांगले संबंध राखण्याचा प्रयत्न भारताने नेहमीच केलेला आहे. अलीकडेच उभय देशांमध्ये आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात एक महत्त्वाचा असा सामंजस्य करार करण्यात आला. तसेच, संरक्षण, उद्योग आणि क्रीडा या क्षेत्रांमध्ये परस्परसहकार्य वाढवण्याच्या दृष्टीनेही काही सकारात्मक पावले उचलण्यात आलेली आहेत. सीमा व्यवस्थापनासंदर्भात वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या सर्व गोष्टींची पूर्तता करून सीमेवर शांतता कशी प्रस्थापित राहील या दिशेने प्रयत्न करण्यावरही दोन्ही देशांचे एकमत झालेले आहे. केवळ सीमाप्रश्न आणि घुसखोरीच नव्हे तर उभय देशांमध्ये पाण्याच्या वाटपासंदर्भात जे वादाचे मुद्दे आहेत तेदेखील चर्चेतून सोडवण्याविषयी हे दोन्ही देश आजघडीला सकारात्मक भूमिकेत आहेत.

पन्नाशीतला हा 'शोनार बांगला' आता एका नव्या वळणावर येऊन ठेपलेला आहे. या देशाला प्रगती साध्य करायची असेल तर भारतासारख्या मोठ्या शेजारी राष्ट्राचे सहकार्य आणि सहयोग मिळत राहिल्यास विकासही वेगाने साधता येईल हे स्वाभाविक ठरते. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे वाढत असलेले महत्त्व लक्षात घेता भविष्यामध्ये भारताशी सौहार्दाचे व मैत्रीपूर्ण नाते प्रस्थापित करणेच या देशासाठी इष्टापत्तीचे ठरेल, हे नक्की. ■■

**पर्यावरण**

# वाढते तापमान जलचरांच्या मुळावर

सातत्याने वाढणा-या प्रदूषणामुळे एक गंभीर प्रश्न जगाला भेडसावतो आहे आणि तो म्हणजे वाढत्या तापमानाचा त्यांपायी पर्यावरणाच्या संभाव्य -हासाचा. या वाढत्या तापमानामुळे अनेकानेक दुष्परिणाम होताना दिसत आहेत. अलीकडेच झालेल्या एका संशोधनानुसार, वाढत्या तापमानामुळे वाहत्या, स्वच्छ पाण्यातील प्राणवायूची मात्रा कमी होत चालली असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, महासागरांच्या तुलनेत झ-यांमधील प्राणवायू कमी होत चालला असल्याचे निदान अभ्यासकांनी केलेले आहे. ताज्या पाण्यातील प्राणवायू कमी होत चालला असल्याने पाण्यात राहणा-या जलचरांवरही त्याचा परिणाम होत असून त्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याचप्रमाणे, आपण जे पाणी पितो त्याच्या गुणवत्तेवरही काही परिणाम होतो आहे का या अभ्यास संशोधकांनी सुरू केलेला आहे.

या संदर्भात अमेरिकेतील Rensselaer Polytechnic Institute (RPI) मधील संशोधनकर्त्यांनी समशीतोष्ण कटिबंधातील जलस्त्रोतांचे सर्वेक्षण केले. त्या पाण्याचे नमुने घेऊन अभ्यास केल्यानंतर त्यांना असे आढळून आले की, १९८० सालानंतर पाण्यातील प्राणवायूची मात्रा कमी होत आलेली आहे. तेव्हापासून आतापर्यंत पाण्याच्या पृष्ठभागावरील प्राणवायू ५.५ टक्क्यांनी तर खोल पाण्यातील प्राणवायूची मात्रा १८ टक्क्यांनी कमी झालेली आहे. ज्या ठिकाणी बाह्य घटकांनी पाणी प्रदूषित झालेले आहे अशा ठिकाणी सायनोबॅक्टेरियामुळे पाण्यावर शेवाळ वाढून परिणामी पाण्यात विषारी पदार्थ वाढू लागले. ते पाणी दूषित होत गेले. पाण्याचे तापमानही वाढत गेले आणि अंतिमतः ते पाणी पिण्यायोग्य राहिले नाही, असेही संशोधनातून समोर आले. अनेकार्थांनी हे संशोधन महत्त्वाचे मानले जाते आहे. जागतिक तापमानबदलामुळे जे काही दूरगामी परिणाम जगभरात होत आहेत त्यातील हा एक महत्त्वाचा परिणाम दिसून आल्याने त्या विषयीचा अभ्यास भविष्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



Rensselaer Polytechnic Institute (RPI) मधील अनुभवी संशोधक Kevin Roje यांच्या मते, सर्वच प्राणामात्रांसाठी प्राणवायू नितांत गरजेचा असतो. पाण्यातील अन्नप्रक्रिया घटकांचाही तो महत्त्वाचा आधार आहे. जेव्हा अशा पद्धतीने पाण्यातील प्राणवायूची मात्रा कमी होऊ लागते तेव्हा ती धोक्याची घंटा असते. कारण त्याचा थेट परिणाम पाण्यामध्ये राहणा-या जलचरांवर व त्यांच्या अस्तित्वावरच होत असतो. त्यामुळे या विषयात अधिक संशोधन होऊन ही परिस्थिती सुधारण्यासाठी किंवा बदलण्यासाठी तातडीने पावले उचलली जाणे गरजेचे आहे अन्यथा प्राणवायूचे असे घटते प्रमाण पाण्यातील प्रजातींच्या मुळावर उठल्याशिवाय राहणार नाही.

या पूर्वी जागतिक पातळीवर तापमानवाढीसंदर्भात जी काही संशोधने झालेली आहेत त्यामध्ये महासागराच्या पाण्यावर काय परिणाम होतो आहे या संदर्भात पुष्कळ संशोधन झालेले आहे. त्यामध्ये देखील समुद्राच्या पाण्यातील प्राणवायू कमी होत असल्याचे निष्कर्ष काही संशोधकांनी पूर्वी जाहीर केलेले होते. परंतु, या नव्या संशोधनाद्वारे मात्र समुद्राच्या तुलनेत झरे, ओढे अशा जलस्त्रोतांतील प्राणवायूचे प्रमाण अधिक वेगाने कमी होत असल्याचे दिसून आले आहे. समुद्राच्या तुलनेत ३ ते ९ टक्के अधिक वेगाने प्राणवायूचे प्रमाण कमी होत चालले असल्याचा संशोधकांचा दावा आहे. हे प्रमाण लक्षणीय असल्याकारणाने एकूणच पाण्यातील जैवविविधतेवर आणि जैविक परिसंस्थेवर त्याचे परिणाम होतील अशी शक्यता अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

जगभरात विविध ठिकाणी जे पाण्याचे साठे १९४१ सालापासून अस्तित्वात आहेत आणि ज्यामध्ये ताजे पाणी येऊन मिळत राहते अशा ४०० तलावांचे निरीक्षण करण्यात आले. पाण्याच्या पृष्ठभागावरील प्राणवायूचे प्रमाण व खोल पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण अभ्यासण्यात आले. विविध हंगामात पाण्याची स्थिती अभ्यासण्यात आली. त्या नंतर संशोधकांच्या हाती अपेक्षित नमुने आले. या अभ्यासासाठी संकलित नमुन्यांच्या आधाराने प्राणवायू आणि तापमानवाढीच्या तुलना करणा-या ४५ हजारांहून अधिक नोंदी संशोधकांनी केलेल्या आहेत. त्यामुळेच हे संशोधन अतिशय महत्त्वाचे मानले जाते. प्रामुख्याने समशीतोष्ण परिसरामध्ये ही पाहणी करण्यात आली. हरितगृह वायू उत्सर्जन, जैव भू-रसायनाची पोषकता आणि मानवी स्वास्थ्य या तिन्हींवर पाण्यातील प्राणवायूची मात्रा परिणाम करत असल्याकारणाने जलजरांच्या बरोबरीने माणसांवरही त्याचा परिणाम होणार आहे, असे संशोधकांच्या लक्षात आले आहे.

प्रस्तुत संशोधनातील मुख्य संशोधक Stephen Jen यांच्या मते, आजघ़डीला संपूर्ण पृथ्वीवर असलेल्या एकूण जलस्त्रोतांमध्ये नैसर्गिक तलावांचे प्रमाण केवळ तीन टक्के इतकेच आहे. परंतु, त्या पाण्यातील जैवविविधता मोठी आहे. त्यामुळे अशा ताज्या पाण्यात आढळून येणारे बदल तेथील जैवविविधतेवर काय परिणाम घडवून आणतात हे पाहणे संशोधकांना गरजेचे वाटते. जागतिक तापमान वाढीचाच हा एक परिणाम असून त्यामुळे पर्यावरणाचा हा समतोल ढासळतो आहे का या दिशेने संशोधक अभ्यास करीत आहेत. पर्यावरणात होणारे बदल आणि पर्यावरणासंबंधातील धोके सूचित करणारे निदर्शक म्हणून ताज्या पाण्याच्या तलावांकडे पाहिले जाते. त्यामध्ये जेव्हा काही बदल झालेले दिसून येतात तेव्हा पर्यावरणाच्या दृष्टीने आपण सजग होणे गरजेचे असते. वायुमंडळातील विविध प्रकारच्या परिवर्तनामुळे पर्यावरणीय परिसंस्था बदलत चालली आहे. वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे आणि सर्व प्रकारचे प्रदूषणही वाढते आहे. बाहेरच्या वातावरणाच्या प्रभावामुळे प्राणवायूचे प्रमाण बदलू शकते. पाण्यातील प्राणवायू कमी होण्याचेही हेच प्रमुख कारण आहे. ‘नेचर’ या जागतिक स्तरावरच्या संशोधनपर नियतकालिकामध्ये अलीकडेच एक वेगळे संशोधन प्रसिद्ध झालेले होते. त्यामध्ये मात्र, काही तलावांमध्ये प्राणवायूचे प्रमाण वाढतही असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आलेले आहे. त्या नुसार, पाण्यावर वाढणा-या शेवाळामुळे पाण्यातील दूषितपणा वाढत जातो आणि बरेचदा पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होण्याचे ते सुद्धा एक कारण ठरते, असेही संशोधकांचे मत आहे. जेव्हा प्राणवायूचे प्रमाण घटते तेव्हा प्राणवायूविना जे सूक्ष्मातिसूक्ष्म जीवजंतू राहू शकतात अशांचे प्रमाण पाण्याच्या पृष्ठभागावर वाढते व त्यांच्या माध्यमातून मिथेन वायूचे प्रमाण वाढू लागते.

अमेरिकेतील ‘स्कूल ऑफ सायन्स’ या संशोधनसंस्थेचे अधिष्ठाता Kert Brainman यांच्या मते, अशी संशोधने वास्तव परिस्थिती जगासमोर आणतात आणि आपल्याला सावध करतात. जलवायू परिवर्तनाचा परिणाम केवळ जलचर आणि मानवांवर होईल असे नाही तर वृक्ष, पशू, पक्षी अशा प्रत्येक घटकावर त्याचा परिणाम होणार आहे हे आपल्याला ध्यानात घ्यावे लागेल. त्यामुळे जलवायू प्रदूषणाला रोखण्यासाठी आज जागतिक स्तरावर जे काही प्रयत्न होत आहेत त्यांना बळकटी देण्याचे काम या महत्त्वपूर्ण अशा संशोधनाद्वारे होणार आहे. जागतिक तापमानवाढीने जर १.५ डिग्री सेल्सिअसची मर्यादा ओलांडली तर त्याचा सर्वांत मोठा परिणाम



कोणत्या प्रजातींवर संभवतो, याचा अभ्यास सध्या संशोधक करीत आहेत. या संदर्भात ‘वर्ल्ड वाइल्डलाईफ फाउंडेशन’ने (डब्ल्यूडब्ल्यूएफ) एक अहवाल सादर केलेला आहे. या अभ्यासानुसार, जर हे तापमान १.५ डिग्री सेल्सिअसच्या पुढे गेले तर पृथ्वीवरील १२ प्रजातींवर त्याचा विपरित परिणाम होणार आहे. त्यांच्या अन्न व पाण्याचे प्रचंड हाल होतील. त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण होईल. डोंगराळ भागातील नैसर्गिक संपन्नेतालाही बाधा येणार असून अनेक जंगले नष्ट होतील अशीही भीती वर्तवली जाते आहे.

हे संभाव्य धोके लक्षात घेता, जागतिक तापमानवाढीच्या संकटाचा सामना करण्यासाठी आणि जीवसृष्टीच्या रक्षणासाठी सर्वांनीच एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. हरितवायू उत्सर्जन कमी करण्यासाठी जागतिक पातळीवर जे लक्ष्य निर्धारित केलेले आहे त्यासाठी सर्वच देशांनी गांभीर्याने प्रयत्न करणेही गरजेचे आहे. तसे न होता आपण बेफिकीरीने वागत राहिलो तर आपल्याच अस्तित्वावर गदा येणार आहे, हे लक्षात घ्यावेच लागेल. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

आरोग्य

# मनःस्वास्थ बिघडवणारा ‘कोविड’ताण

‘कोविड १९’ नामक एका अपूर्व संसर्गाने अवघे जग आजमितीला त्रस्त झालेले आहे. गेल्या दोन वर्षांपासून ‘बंद’ आणि ‘बंदी’ या दोन शब्दांभोवती आपण सारेच जण फिरत आहेत आणि इतके होऊनदेखील अनिश्चिततेचे आणि अस्थिरतेचे सावट अद्याप सरलेले नाही. ‘कोविड १९’च्या संसर्गाची भीती हे त्या मागील एक प्रमुख कारण आहेच; परंतु, त्याच्या जोडीला गेल्या दोन वर्षांपासून सर्वांनाच ज्या विविध प्रकारच्या ताणांच्या सावटाखालून जावे लागत आहे त्याचे स्वरूप दिवसेंदिवस गंभीर होताना दिसते आहे. हा नवा ‘कोविडताण’ या सगळ्याला कारणीभूत ठरतो आहे. मनःस्वास्थ्य आणि शरीर अशा दोन्हींवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

पहिल्या टाळेबंदीपासून ते ‘कोविड’च्या दुस-या लाटेपर्यंत अनेकांच्या जीवनात मोठ्या उलथापालथी घडून आलेल्या आहेत. कित्येकांची कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत. अनेकांना ‘कोविड’च्या संसर्गामुळे प्राण गमवावे लागलेले आहेत. कुणाचे जवळचे आप्त गेलेले आहेत तर कुणी चांगले मित्र गमावले आहेत. आई-वडिलांचे छत्र हरपल्याने कित्येक मुले पोरकी, एकाकी झालेली आहेत. जे तग धरून आहेत. त्यांतील अनेकांचे व्यवसाय ठप्प झालेले आहेत. कित्येकांच्या उदरनिर्वाहाचे साधनच संपल्यात जमा आहे. एकीकडे नोक-यांवर संक्रात आली आहे तर दुसरीकडे रोजगारकपातीची टांगती तलवार आहेच. अशा सगळ्या विमनस्क अवस्थेत एकीकडे ‘कोविड’च्या संकटापासून जीव वाचवण्याचे आव्हान आहे आणि दुसरीकडे आला दिवस ढकलून कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा तरी कसा या विवंचनेशी सामना आहे. अशा तणावपूर्ण काळातून जाताना मनःस्वास्थ बिघडवण्यास छोटेसे निमित्तही पुरेसे ठरते आहे. मानसिक पातळीवरचा संघर्ष सहन करू न शकणारे लोक आत्मघातासारखे टोकाचे पाऊलही उचलू लागल्याचे कटू वास्तव जागतिक पातळीवरील अभ्यासांतून समोर येते आहे.



‘कोविड १९’च्या वाढत्या प्रभावामुळे जगभरात आत्महत्यांचे प्रमाण वाढते आहे का याचा अभ्यास Lancet Psychiatry Journal या प्रतिष्ठीत नियतकालिकाने अगदी अलीकडेच प्रसिद्ध केला. मात्र, हा अभ्यास पहिल्या लाटेच्या सुरुवातीच्या काळात केलेला असल्याने अर्थातच त्या काळात आत्महत्यांचे प्रमाण फारसे नव्हते. एवढ्या कमी कालावधीत पहिल्या लाटेचे दुष्परिणाम लगेच जाणवले नाहीत परंतु त्या पुढील काळात मात्र आत्महत्यांची संख्या वाढत चालली असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. Lancet Psychiatry Journal या नियतकालिकाने अभ्यास केला तेव्हा या साथीच्या फैलावाची नुकती कुठे सुरुवात झालेली होती आणि त्या वेळी, हे संकट थोड्या काळापुरते असेल आणि लवकरच पुन्हा सुरळीत जीवन सुरू झालेले असेल, अशी अपेक्षा सा-यांनाच होती. मात्र, तो भ्रमनिरास ठरला आणि त्यापुढे दीड वर्षांचा कालावधी उलटला तरीही परिस्थिती अद्याप पूर्णतः बदलायला तयार नाही. विशेषतः, साथीच्या आजाराचे आर्थिक दुष्परिणाम जेव्हा टोकाला पोहोचतील तेव्हा जी परिस्थिती असेल तिचा लोकांच्या मानसिकतेवर काय परिणाम होतो हे पाहावे लागेल, कारण तेव्हाच सर्वाधिक गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असण्याची शक्यता आहे, असे मत अभ्यासकांनी प्रस्तुत अभ्यासादरम्यान मांडलेले आहे. काळ जसजसा पुढे सरकतो आहे तसे तसे लोकांमधील नैराश्याचे प्रमाणही वाढत चालले असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलणा-या लोकांची संख्या ‘कोविड १९’ च्या पहिल्या लाटेनंतर आता वाढू लागली आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. अर्थात, प्राप्त परिस्थितीतून जो नकारात्मक परिणाम आणि ताण निर्माण होतो आहे त्याचे स्वरूप जाणून घेण्यासाठी आत्महत्येची संख्या हा एकमेव निकष ठरू शकत नाही, ही भूमिका अभ्यासकही मान्य करतात.

‘कोविड १९’च्या दुस-या लाटेनंतर जगभरात आत्महत्येस प्रवृत्त होणा-यांचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत ४४ टक्क्यांनी किंवा टोकाच्या नैराश्यातून स्वतःला गंभीर दुखापत करून घेण्याचे प्रमाण ७१ टक्क्यांनी वाढल्याचे नव्या अभ्यासातून समोर आले आहे. या काळात विविध देशांमध्ये दोन वेळा टाळेबंदी करावी लागलेली आहे. दीर्घकाळ ही आपत्ती टिकून राहील याची पूर्वकल्पना कुणालाच नसल्याने त्याचा सर्वांत मोठा परिणाम लोकांच्या जमापुंजीवर झाला. विशेषतः, मध्यमवर्गीय आणि निम्न आर्थिक स्तरातील लोकांना आर्थिक चणचण मोठ्या प्रमाणावर भासू लागली. त्याच वेळी रोजगारावरही कु-हाड आली. परिणामतः एकीकडे रोगाचे संकट आणि

दुसरीकडे जगण्याची भ्रांत अशा चरक्यात असंख्य माणसे अडकली. त्यातूनच लोकांमध्ये मानसिक नैराश्य वाढू लागलेले आहे. वेतनाच्या भरवशावर ज्यांनी मोठी कर्ज उचलली होती, मुलांना मोठ्या शाळांमध्ये कौतुकाने घातलेले होते त्यांच्या पुढे मोठे प्रश्नचिन्ह आहे. नोकरी टिकून आहे ते लोक 'आज आहे तर उद्या असेल की नाही' अशा संभ्रमावस्थेत आहेत. रोजगार गमावलेल्या लोकांना समोर कोणतेही नवे मार्ग दिसत नाहीत. या सगळ्यांचा परिणाम कळत-नकळतपणे त्यांच्या मनावर आणि स्वास्थ्यावर होतो आहे. निद्रानाशासारखे आजार झालेले लोक असंख्य आहेत. 'कोविड'मुळे आपलाच मृत्यू झाला तर आपल्या कुटुंबाकडे कोण पाहणार या चिंतेने ग्रासलेलेही अनेक आहेत. 'कोविड'संबंधातील विविध सूचना सातत्याने कानावर पडल्यामुळे Obsessive Compulsive Disorder हा मानसिक आजार होणा-यांची संख्या वाढते आहे. एकत्र कुटुंबात राहणा-या लोकांना परस्परांशी जुळवून घेणे, सौहार्दपूर्ण संवाद साधणे अवघड जाऊ लागले आहे. परिणामी अनेक घरांत स्त्री-पुरु षांचा शीघ्रकोपीपणा वाढत चाललेला आहे. छोट्या छोट्या कारणांसाठी लोक हमरीतुमरीवर येत असल्याचे चित्रही सररास दिसून येते.

छोट्या घरांमधील समस्या आणखीनच वेगळ्या आहेत. शाळा, कार्यालये आणि घरगुती कामे या सगळ्यांची सरमिसळ तिथेच झाल्याने त्रागा होण्यासाठी अगदी छोटेसे निमित्तही पुरेसे ठरते आहे. एकमेकांचीच सोबत असणा-या ज्येष्ठांसाठी साध्या साध्या गोष्टीदेखील चिंतेचे कारण ठरत आहेत. 'कोविड' च्या संक्रमणकाळात परिस्थिती कितीही गंभीर होत गेली असली तरी स्वतःला अधिकाधिक सकारात्मक ठेवण्याचा, सहनशीलतेने आणि संयमाने पुढे जात राहण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. परंतु, काळ जसजसा अधिक पुढे सरकतो आहे तसतशी त्यांच्या संयमाची मर्यादा संपत चालली आहे आणि त्यातून अनेक लोक नैराश्याकडे झुकू लागलेले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, समाजामध्ये आत्महत्यांसारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या घटनाही दिसून येऊ लागल्या आहेत. ही सारी त्या 'कोविडताणा'चीच परिणती मानावयास हवी. अशा सर्वांना मानसिक आधाराची मोठी गरज आजघडीला निर्माण झालेली आहे, असे अभ्यासकांचे मत आहे.

रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योग आणि व्यवसाय क्षेत्र अद्यापही निर्बंध आणि टाळेबंदीच्या कचाट्यातच अडकलेले आहेत. त्यामुळे तिथेही अधांतर अवस्था आहे. बहुतांश कर्मचा-यांच्या डोक्यावर अनिश्चिततेची टांगती तलवार आहे. मोठ्या



उद्योगांचीही जिथे वाताहत झालेली आहे तिथे छोट्या उद्योगांचे हाल काय सांगावेत! टाळेबंदीचे दुष्टचक्र संपून २०२० सालातील नोव्हेंबर ते २०२१ या कालावधी दरम्यान 'न्यू नॉर्मल'च्या दिशेने सर्वांची पावले पडू लागली होती. परंतु, 'कोविड'ची दुसरी लाट आली. उद्योगविश्वाचे चक्र जरा कुठे फिरू लागले होते तोच दुस-या लाटेच्या तडाख्याने होत्याचे नव्हते केले. विविध शहरांतील सार्वजनिक वाहतूक थांबली. जगभरात विमानसेवा स्थगित झाली. आयात-निर्यात पूर्ण ठप्प झाली.

दुस-या लाटेनंतरची परिस्थिती मात्र आणखी बिकट ठरते आहे असे अभ्यासकांच्या निदर्शनास येते. पहिल्या टाळेबंदीच्या वेळी उद्योगविश्वातील लहान-मोठ्या सर्वच उद्योगांनी त्या परिस्थितीला धीराने तोंड दिले. कारण ही परिस्थिती बदलेल अशी आशा होती. परंतु, दुस-या वेळी पुन्हा तशीच परिस्थिती उद्भवल्यानंतर मात्र आता हतबलता अनुभवास येऊ लागलेली दिसते. परिणामतः अनेक उद्योग बंद पडलेले आहेत. कसेबसे टिकून असलेल्या त्या छोट्या उद्योजकांचा जीव पार मेटाकुटीला आलेला आहे. व्यवसाय सुरू करताना ज्यांनी कर्ज काढलेली होती त्यांची अवस्था आणखीनच वाईट आहे. जागेचे भाडे, वीज-पाणी-दूरध्वनीची देयके, विविध कर हे सगळे खर्च भागवताना त्यांच्या नाकीनऊ आलेले आहेत.

लघु व मध्यम उद्योगांना गेल्या दीड वर्षांत मोठ्या आर्थिक नुकसान आणि तणावांचा सामना करावा लागलेला आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे ओझे डोईवर आहे. त्याची फेररचना करून द्यायला बँका सध्या तरी तयार नाहीत. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. कच्च्या मालाचा तुटवडा आहे. भारतामध्ये सात कोटींहून अधिक लघु व मध्यम उद्योग कार्यरत आहेत. त्यापैकी ४५ लाख उद्योग 'कोविड'काळात बंद पडलेले आहेत. एक कोटी लघु उद्योग आता दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आलेले आहेत, अशी माहिती पुणे येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज असोसिएशनने जाहीर केलेली आहे. प्राप्त परिस्थितीत सरकारने व्यावसायिक व उद्योजकांच्या डोक्यावरील इतर ओझी कमी करावीत अशी अपेक्षा उद्योगविश्वातून व्यक्त होते आहे. लघु उद्योगांसह सर्वच उद्योगक्षेत्राला चालना देण्यासाठी सरकारने आर्थिक मदतीचा हात देणे आणि या परिस्थितीचा सामना करावा कसा या विषयी मार्गदर्शन देणे अपेक्षित आहे, अशी भावना उद्योगविश्वाशी संबंधित राष्ट्रीय संघटनांकडून व्यक्त केली जाते आहे. उद्योगक्षेत्राला आलेली मरगळ अंतिमतः त्यात कार्यरत असणा-या लोकांच्या मानसिकेतवर आघात करतेच, त्यामुळे त्यातून नकारात्मक *(कृपया पृष्ठ क्रमांक २१ पाहावे.)*

# समस्या वाढत्या बालमजुरीची...

बालमजुरी म्हणजे सामाजिक जीवनाला लागलेला एक शापच. कोवळ्या वयातील मुलांकडून कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रमाचे काम करवून घेणे हे अमानवी कृत्य आहे असे समजले जात असतानाही केवळ भारतच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये लहान मुलांना विविध कामांना जुंपले जाते आणि कमीत कमी वेतनावर अधिकाधिक कामे करवून घेत त्यांची पिळवणूक केली जाते. कामाच्या ठिकाणी होणारा अन्याय सहन करीत ही मुले काहीही विरोध न करता नाइलाजाने कामे करीत राहतात आणि त्यात त्यांचे निष्पाप, निरागस बालपण पार करपून जाते हे बहुतांश ठिकाणचे वास्तव आहे. वयात न आलेल्या मुलांना राबवून घेणे व त्यांच्याकडून सक्तीने मजुरी करवून घेणे हे केवळ गैरच नव्हे तर बेकायदेशीर कृत्य असले तरीही आजही अनेक देशांमध्ये ही समस्या अधिकच तीव्र होत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

'कोविड १९'च्या संकटामुळे जगभरातील उद्योग-व्यवसायांचे आर्थिक गणित पार कोलमडलेले आहे. कामावर असणा-या कर्मचा-यांना आणि मजुरांना पूर्वीच्या वेतनामध्ये कामे देत राहणे आता अनेक व्यावसायिकांना परवडेनासे झाले आहे. त्या ऐवजी लहान मुलांना कामावर ठेवले तर कमी पैशांत मुले कामे करतात आणि त्यांना हव्या त्या पद्धतीने राबवून घेता येते. हे लक्षात आल्याने 'कोविड'च्या पहिल्या आणि दुस-या लाटेनंतर बालमजुरांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत चालली असल्याचे ज्वलंत वास्तव समोर येते आहे. लहान मुलांनी ज्या वयात खेळायला हवे, शाळेत शिकायला हवे त्या वयात अनेक लहान मुले बालमजुरीच्या विळख्यामध्ये घुसमटत आहेत आणि अनेक प्रकारच्या कामांच्या ओझ्याखाली त्यांचे बालपण होरपळून जाते आहे. बालमजुरीची समस्या केवळ आजची नसून कैक वर्षांपासून विविध देशांत ही समस्या दृढमूल होऊन बसलेली आहे. 'कोविड १९' च्या संसर्गापायी उभ्या जगावर ओढवलेल्या नव्या संकटामुळे बालमजुरांचे प्रमाण अधिकच वेगाने वाढू लागले आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण सांगते.



'ह्यूमन राईट वॉच' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थेने I Must Work To It या अहवालामध्ये हे वास्तव अधोरेखित केले आहे. भारताच्या जोडीनेच नेपाळ, युगांडा आणि घाना या छोट्या देशांमध्ये बालमजुरीचे प्रमाण लक्षणीय रीतीने कसे वाढते आहे याचा अभ्यासपूर्ण आलेख प्रस्तुत अहवालाद्वारे मांडण्यात आला आहे. हलाखीच्या परिस्थितीमुळे बालमजुरी करणा-या मुलांची संख्या वरील देशांमध्ये मोठी आहेच; परंतु आता या देशांमध्ये लहान मुलांकडून कामे करवून घेण्यासंदर्भातील दबाव वाढतो आहे. मुलांच्या क्षमतेपेक्षा कामाचा अधिक बोजा त्यांच्यावर लादून हे सारे काम बिनबोभाट करवून घेतले जाते आहे. तसेच कामाच्या नियोजित वेळेपेक्षा अधिक तासांसाठी त्यांना राबवले जाते आहे, हे वास्तवही मुलांशी केलेल्या चर्चेतून समोर उभरते. या सगळ्याचा विपरित परिणाम मुलांच्या आरोग्यावरही होत असल्याची आशंका प्रस्तुत अहवालात वर्तवण्यात आलेली आहे. अर्थात, हा संपूर्ण अहवाल प्रामुख्याने नेपाळ, युगांडा आणि घाना या तीनच देशांतील वास्तव परिस्थितीवर बोट ठेवत असला तरीदेखील कमी अधिक फरकाने तशीच परिस्थिती जगातील अनेक देशांमध्ये आजघडीला दिसून येते, असा अभ्यासकांचा दावा आहे.

या समस्येचे वास्तव स्वरूप जाणून घेण्यासाठी अभ्यासकांनी नेपाळ, घाना आणि युगांडा येथील अनेक बालमजुरांशी प्रत्यक्षात संवाद साधला. बालमजुरी करणारी बहुतांश मुले जेमतेम आठ-दहा वर्षांची आहेत. बहुतांश मुले वीटभट्टी कारखाने, चटया बनवण्याचे कारखाने, सोन्याच्या व कोळशाच्या खाणी, मत्स्यपालन व विक्री, शेती व शेतीपूरक उद्योगांमध्ये कामे करतात. गॅरेजमध्ये मदतनीस म्हणून काम करणा-या मुलांची संख्या मोठी आहे. सामानाची, भाज्यांची विक्री रस्त्यावर करण्याचे काम करण्यासाठी कुटुंबातील व्यक्तीच त्यांना प्रवृत्त करीत असल्याचे दिसून आले आहे. हातावर पोट असणा-या अनेकानेक कुटुंबांना 'कोविड'मुळे मोठी आर्थिक झळ बसते आहे. आर्थिक विपन्नावस्थेमुळे आणि अर्थार्जनाचा अन्य दुसरा कोणताही पर्याय पालकांकडे उपलब्ध नसल्याने मजुरी करावी लागत असल्याचे मुलांनी संवादादरम्यान कथन केले. या मुलांमधील अनेक मुले पहिल्यांदाच मजुरीची कामे करीत असल्याचेही चर्चेदरम्यान आढळून आले. पूर्वी आई-वडील नोकरी करीत होते परंतु 'कोविड'च्या फैलावापायी हातची नोकरी गेली आहे. घर चालवणे मुश्कील झालेले आहे आणि त्यामुळे हलाखीत दिवस काढावे लागत आहेत. सुरू असणारे व्यवसाय आता बंद पडलेले आहेत. नवे काही सुरू करण्यासाठी भांडवल द्यायला कुणीही तयार नाही

आणि व्यवसाय नव्याने सुरू केला तरी चालण्याची शाश्वती नाही, अशा विचित्र कात्रीत असंख्य कुटुंबे सापडलेली आहेत. बाजारामध्ये काही वस्तूंची विक्री करण्याची सुलभता आणि संधी यावरही अनेकानेक मर्यादा आलेल्या आहेत. ग्राहक मर्यादित प्रमाणातच बाजारहाट करीत असल्याने अपेक्षित विक्री होत नाही. या सगळ्याचे पर्यवसान म्हणून कुटुंब जगवण्यासाठी मुलांना अर्थार्जन करण्यास लावून आर्थिक आधार मिळवण्याखेरीज दुसरा कोणताही पर्याय राहिला नसल्याचे पालक सांगत आहेत. 'कोविड'नंतर परिस्थिती काही प्रमाणात सामान्य होत असतानादेखील ज्या मुलांनी अडचणीच्या काळात बालमजुरी सुरू केलेली होती त्यांनी काम सुरूच ठेवलेले आहे, असेही चित्र काही ठिकाणी दिसते.

बालमजुरीत पिळवणूक अधिक होते आणि जोरजबरदस्ती केली जाते, कमीत कमी वेतन देऊन अधिकाधिक काम करवून घेतले जाते अशी व्यथा अनेक लहान मुलांनी मांडली. घरची परिस्थिती खूपच बिघडल्याने आणि 'उपाशी मरू की काय' अशी वेळ आल्याने मजुरी करण्याशिवाय पर्यायच उरला नाही, असे युगांडा आणि घानातील अनेक मुलांनी सांगितले. 'कोविड'मुळे आई-वडिलांचा मृत्यू झाल्याने पोरकेपण आलेलीही अनेक मुले आहेत. भावंडांसह संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आलेली आहे. खाणींमध्ये, कारखान्यांमध्ये अथवा शेतात, जिथे मिळेल तिथे काम स्वीकारायचे आणि उपजीविका भागवायची हा एकच पर्याय त्यांच्यासमोर उरला होता. मुलांकडून मजुरी करवून घेताना नियोजित वेळेपेक्षा अधिक काळासाठी काम करवून घेतले जाणे आणि पुरेशी मजुरीदेखील न देणे ही बहुतांश ठिकाणची मानसिकता आहे. खाणीत काम करणा-या लहान मुलांवर त्यांच्या शारीरिक क्षमतेपेक्षा अधिक ताकदीची कामे लादली जातात. अनेकदा हातोड्याने दगड फोडावे लागतात किंवा अवजड यंत्रांवरसुद्धा काम करावे लागते. खाणीतील धूळ आणि अतिसूक्ष्म कणांमुळे या मुलांच्या आरोग्यासह दृष्टीपटलावरही परिणाम होतो आहे, अशीही गंभीर बाब निदर्शनास आलेली आहे. बहुतांश मुलांना आठवड्याचे सातही दिवस १० तासांपेक्षा अधिक काळ मजुरी करावी लागते. नेपाळमध्ये तर दिवसातून १४ तास काम करावेच लागते, अशी माहिती अनेक बालकांनी दिली. बळजबरी बरोबरच असतानाही ठरलेल्या वेतनापेक्षा कमी वेतन दिले जात असल्याची तक्रार सर्वेक्षणात सहभागी मुलांपैकी ८० टक्के मुलांनी केली. क्षुल्लक कारणांचे निमित्त काढून मुलांना वेतन नाकारले जाते. श्रमाच्या तुलनेत वेतन मात्र तुटपुंजे दिले जाते अशी खंत मुलांनी व्यक्त केली आहे.



जगावर आलेले हे आर्थिक संकट लाखो लहान मुलांना बालमजुरीच्या गर्तेत ढकलून देईल अशी आशंका यापूर्वीही International Labour Organization (ILO) आणि UNICEF या संघटनांनी व्यक्त केलेली होती. 'कोविड १९'च्या प्रभावामुळे जे गंभीर परिणाम होत आहेत त्यामध्ये बालमजुरांची वाढती संख्या हा एक प्रमुख होय. आजघडीला जगभरात तब्बल १६ कोटी बालके बालमजुरीच्या विळख्यात अडकलेली आहेत. त्यामध्ये ४० टक्के प्रमाण मुलींचे आहे. जगभरातील प्रत्येक दहावे मूल बालमजुरीच्या विळख्यात अडकलेले आहे. म्हणूनच या संदर्भात तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. बालमजुरी करणा-या एकूण मुलांपैकी जवळपास आठ कोटी मुले ही अत्यंत जोखमीच्या कामांत गुंतलेली असतात. अशा क्षेत्रांत काम करणा-या मुलांच्या स्वास्थ्यावर विपरित परिणाम होतो आहे. जीवाचा धोका पत्करून अगदी लहान वयात या मुलांना अनेक कामे करावी लागतात. कामाच्या निवडीचे कोणतेही स्वातंत्र्य या मुलांना नसल्याने विविध कामांची सक्ती करून बळजबरीने ही कामे करवून घेतली जातात. मुलांच्या शारीरिक मर्यादा लक्षात घेता अशा कामांचा त्यांच्या शरीरावर परिणाम तर होतोच त्याचबरोबर मनःस्वास्थ्यावरसुद्धा विपरित परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. बालमजुरीच्या विळख्यात अडकलेली अनेक मुले पुढील काळामध्ये गुन्हेगारीच्या क्षेत्राकडे वळत असल्याचेही एक धक्कादायक वास्तव चिंतेत भर घालणारे आहे.

बालमजुरीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून जगभरात अनेक पातळ्यांवर सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. हे प्रमाण जगभरात कमी होत असल्याचे एक आशादायी चित्र २००० सालानंतर अगदी अलीकडच्या काळापर्यंत दिसून येत होते. मात्र, 'कोविड'च्या संकटामुळे गेल्या २० वर्षांत पहिल्यांदाच बालमजुरीच्या आकडेवारीत इतकी लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २००० साली सुमारे २४ कोटी मुले बालमजुरी करीत होती. जागतिक स्तरावर विविध देशांनी या संदर्भात केलेल्या प्रयत्नांमुळे, जागृतीपर विविध मोहिमांमुळे बालमजुरी रोखण्यासाठी पावले उचलण्यात आली. या संदर्भात कठोर कायदे केले गेले. परिणामतः २००२ साली जगातील बालमजुरांची संख्या दोन कोटींनी घटली. २०१६ सालापर्यंत बालमजुरांची संख्या १५ कोटींपर्यंत खाली आणण्याचे यशस्वी प्रयत्न जागतिक पातळीवर झाले. परंतु, 'कोविड'च्या प्रादुर्भावानंतर दुर्दैवाने ही संख्या पुन्हा एकदा वाढू लागल्याचे वास्तव समोर आले आहे. 'कोविड'च्या संकटानंतर सुमारे एक कोटी मुले नव्याने

बालमजुरीच्या विळख्यात ओढली गेलेली आहेत आणि आगामी काळात हे प्रमाण आणखी वाढत जाण्याची आशंका वर्तवली जात असल्याने ही बदलती जागतिक परिस्थिती कुणालाही अस्वस्थ करून सोडेल अशीच आहे.

बालमजुरी दरम्यान शेतीसंबंधित कामांमध्ये सर्वाधिक लहान मुले जुंपली जातात असे लक्षात येते. कारण जगभरातील ही संख्या एकूणात ११ कोटी इतकी आहे. त्या खालोखाल सेवाक्षेत्राशी संबंधित व्यवसायांमध्ये बालमजुरीचे प्रमाण अधिक आहे. विविध प्रकारचे कारखाने, लघुउद्योग, हॉटेलव्यवसाय या ठिकाणी पाच वर्षांपासून ते १७ वर्षापर्यंतची विविध वयोगटांतील मुले मोठ्या संख्येने दिवसभर राबत असतात. 'कोविड'नंतर ज्या अस्थिर आणि असुरक्षित अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो आहे तो लक्षात घेता आगामी काळात मोठ्या प्रमाणावर रोजगार कपात आणि वेतनकपात होणार असल्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय पातळीवरून वर्तवला जातो आहे. जागतिक अनुमानानुसार, जगभरातील २४ कोटींहून अधिक श्रमिक रोजगारास मुकण्याची येत्या काळात शक्यता आहे. अशा परिस्थितीत बालमजुरीचे संकट अधिकच गडद होत जाईल अशी आशंका वर्तवण्यात येते आहे.

जगभरात एकूणात जवळपास ७० टक्के मुले ही केवळ शेतीक्षेत्राशी संबंधित बाबींमध्ये बालमजुरी करतात. त्या खालोखाल सेवा क्षेत्राचे प्रमाण २० टक्के तर उद्योगक्षेत्रांचे प्रमाण १० टक्के असे आहे. परंतु, बालमजुरी या विषयावर जेव्हा जेव्हा चर्चा होते तेव्हा प्रामुख्याने औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील बालमजुरीचेच चित्र प्राधान्याने समोर येते. परिणामतः, सर्वाधिक बालमजुरी जिथे प्रकर्षाने आहे त्या कृषीक्षेत्रामध्ये मात्र 'जैसे थे' परिस्थितीच राहते आणि ती बरेचदा दुर्लक्षित राहते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागातील बालमजुरीचे प्रमाण हे तिप्पट आहे, हे वास्तवच गंभीर आहे. त्यामुळे या समस्येचे खरे निराकरण जर करावयाचे असेल तर उद्योग-सेवा क्षेत्रांच्या जोडीला कृषीक्षेत्रावर अधिक गांभीर्याने लक्ष देऊन तिथे मजुरी करणारी मुले कशी मुक्त होतील यावर भर देणे गरजेचे आहे, असे अभ्यासकांचे निरीक्षण आहे.

'युनिसेफ' आणि 'आयएलओ' या उभय संस्थांच्या संयुक्त अहवालात नमूद केल्यानुसार, आजघडीला जे देश गरीबीच्या छायेमध्ये आहेत अशा देशांमध्ये बालमजुरीची समस्या अधिक तीव्र होते आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, आफ्रिकेमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलेले आहे.



वाढती लोकसंख्या, आर्थिक उत्पन्नाची अनिश्चितता, गरीबी, सामाजिक सुरक्षिततेच्या हमीचा अभाव या विविध कारणांमुळे गेल्या चार वर्षांमध्ये आफ्रिकी देशांमध्ये बालमजुरांच्या संख्येत सुमारे एक कोटीहून अधिक भर पडलेली असावी असा अंदाज वर्तवण्यात येतो आहे. २०२२ सालाच्या अखेरीस जगभरात साधारणतः आणखी ९० लाख मुले बालमजुरीच्या विळख्यात नव्याने जखडली जाऊ शकतील असा इशारा या अहवालाद्वारे देण्यात आला आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या आणि बालहक्कांच्या उपाययोजना काटेकोरपणाने अवलंबल्या गेल्या नाहीत तर ही संख्या आणखी वेगाने वाढू शकते, अशीही भीती अभ्यासकांनी व्यक्त केलेली आहे.

जागतिक टाळेबंदीचे हे आता दुसरे वर्ष आहे. अनेक देशांत शाळा बंद ठेवाव्या लागलेल्या आहेत. आर्थिक अस्थिरता मोठी आहे. सरकारी पातळीवर आर्थिक तरतूदींचा हात आखडता आहे. बाजारपेठेचीही चक्रे अद्याप म्हणावी तशी गतिमान झालेली नाहीत. रोजगार व वेतन कपातीची टांगती तलवार लोकांच्या डोक्यावर आहे. त्यामुळे या परिस्थितीमध्ये हातावर पोट असणा-या अनेक कुटुंबांना नाइलाजाने काही कठोर निर्णय घ्यावे लागत आहेत आणि आपल्या मुलांना विविध कामांमध्ये जुंपावे लागते आहे. बालमजुरीच्या विरोधातील लढाई आपण दिवसागणिक हारत चाललो असून विविध देशांतील सरकारांनी व वित्तीय संस्थांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी पुढाकार घेणे, पावले उचलणे, बालमजुरीच्या विळख्यातून बाहेर पडून ही मुले पुन्हा शाळेकडे कशी वळतील यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे, अशी भूमिका 'युनिसेफ'चे कार्यकारी संचालक Henrietta Fore यांनी मांडली आहे.

थोडक्यात, 'कोविड' च्या जागतिक संकटामुळे जागतिक पातळीवर जी उलथापालथ झालेली आहे आणि जी मोठी स्थित्यंतरे घडून येत आहेत त्यामध्ये बालमजुरांची झपाट्याने वाढणारी संख्या हे चिंतेचे एक मोठे कारण आहे. सध्याचा अवस्थांतराचा हा काळ पाहता या समस्येतून लगेचच मुक्त होता येईल अशी सध्याची परिस्थिती नाही. परंतु असे असले तरीही भविष्याच्या दृष्टिकोनातून विचार करता अशा सर्व मुलांना सामाजिक सुरक्षितता आणि शिक्षणाची संधी पुन्हा मिळवून द्यावी लागणार आहे. त्या पार्श्वभूमीवर, आज जगासमोर निर्माण झालेल्या या गंभीर समस्येचे निराकरण करण्यासाठी सर्वच देशांना कंबर कसून नियोजनबद्ध असे प्रयत्न करावे लागणार आहेत आणि परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी सावरावी लागणार आहे, हे मात्र नक्की. ■■

# जिकडे-तिकडे

# पाणी जपणारे एक गाव

आधुनिकतेचा आणि भौतिक सोयीसुविधांचा अंगीकार करीत माणसाची जीवनशैली जसजशी विकसित होत गेली त्याप्रमाणे आपोआपच जुन्या जीवनशैलीचा विसर पडत गेला. या नव्या आधुनिक जीवनपद्धतीला आपण गुणदोषांसह स्वीकारले खरे; परंतु, नवोपलब्ध समृद्धीचा उपभोग घेत असताना निसर्गाचेही आपण काही तरी देणे लागतो आणि पर्यावरणाचेही संरक्षण करणे गरजेचे आहे या बाबी मात्र काही प्रमाणात दुर्लक्षिल्या गेल्या आणि त्यामुळे आजच्या घडीला पर्यावरणाचे अनेक प्रश्न आ वासून जगासमोर उभे राहिलेले आहेत. मात्र, या सर्व प्रकारच्या आधुनिक जगण्याला छेद देणारी जीवनशैली भारतातील नागालँडमधील Kikruma नावाच्या एका गावाने जपलेली आहे आणि या प्राचीन जीवनशैलीद्वारे हे गाव पाण्याचे जतन आणि पर्यावरणाचे रक्षण या दोन्ही बाबी साध्य करीत असल्याचे दिसून आले आहे. 'इंडियन जर्नल ऑफ हिल फार्मिंग' या नियतकालिकामध्ये अलीकडीच या विषयाचा वेध घेणारा एक अभ्यासलेख प्रसिद्ध झाला आहे आणि त्यामुळे ही अनोखी बाब सार्वजनिक विचारविश्वात प्रवेश करती झालेली आहे. नैसर्गिकरीत्या प्राप्त होणा-या पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन, जलसंधारण करण्याच्या प्राचीन पद्धती या गावाने आजही जोपासलेल्या आहेत. पर्यावरण संरक्षणाविषयी हे गाव अतिशय सजग आहे.

नागालँडमधील Phek या जिल्ह्यातील Pfutsero या शहरापासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर Kikruma हे गाव वसलेले आहे. नजिकच्या गावांमध्ये दरवर्षी सरासरी १६०० मिलीमीटर इतका पाऊस पडतो. परंतु, या गावामध्ये मात्र दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी असते. हे गाव १२०० मीटर उंचीवरच्या डोंगरावर एका समतल मैदानावर आहे. या गावाच्या दक्षिणेला Sedju ही नदी तर उत्तरेला Khuza ही नदी आहे. या हंगामी नद्या असून या दोन्ही नद्यांतील पाण्याचा उपयोग हा प्रामुख्याने डोंगररांगांच्या पायथ्याशी शेती करण्यासाठी केला जातो. Kikruma या गावामध्ये शेती खूप उंचावर करावी लागते. अशातच पर्जन्यमान कमी असल्याने कमी पावसात



शेती करण्याचे एक मोठे आव्हान गावक-यांच्या पुढ्यात आहे. पिण्याच्या पाण्याचीदेखील येथे मोठी टंचाई भेडसावते. त्यामुळे पाणी साठवण्यासाठी या गावातील लोकांनी प्राचीन पद्धतीची कास सोडलेली नाही आणि वर्षानुवर्षे पाणी जपण्याची पद्धती त्यांनी जपलेली आहे. सिंचनासाठी लागणारे आणि पाळीव प्राण्यांना पिण्यासाठी लागणारे पाणी येथे तलावांमध्ये साठवले जाते. अशा पद्धतीने साठवलेल्या पाण्याचा उपयोग तिथे राहणारे रहिवासी पिण्यासाठी अगदी क्वचितच करतात. उन्हाळा सुरू झाल्यानंतर मार्च-एप्रिल महिन्यांच्या दरम्यान हे तलाव आटून जातात तेव्हा त्यांची देखभाल आणि दुरुस्ती करण्याचे काम गावातील लोक नियमितपणे करतात.

Kikruma या गावातील लोक नैसर्गिक संसाधनांना अतिशय महत्त्वाचे मानतात. निसर्गाने दिलेली प्रत्येक गोष्ट आपण जपायला हवी आणि तिचा काळजीपूर्वक वापर करायला हवा अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे एकूणच नैसर्गिक संसाधनांचे जतन-संवर्धन करण्यावर त्यांचा भर आहे. या साठी शेकडो वर्षांपासून ज्या प्रणालीचा वापर केला जातो त्यास Zabo प्रणाली असे संबोधले जाते. Zabo या शब्दाचा अर्थ 'जलसंचय' असा होतो. डोंगरांवर जी जंगलसंपदा आहे तिचे जतन आणि संवर्धन करण्यावर त्या अंतर्गत विशेषत्वाने भर दिला जातो. डोंगरांवरून वाहून जाणारे पाणी त्यामुळे आपोआपच साठते आणि जमिनीतही मुरते. डोंगरउतारावरून जाणारे पाणी तसेच वाहून जाऊनये आणि भविष्यातील वापरासाठी ते साठवले जावे म्हणून डोंगराखाली खास तलाव बांधले जातात आणि त्यांत पावसाचे पाणी साठवले जाते. डोंगरपायथ्याशी शेतीसाठी सुयोग्य अशी जागा निवडून तिथे धान्याची शेती केली जाते. पाण्याचा प्रत्येक थेंब अतिशय मोलाचा असून तो जपायला हवा आणि त्याचा वापरही काळजीपूर्वकच करायला हवा हा विचार Zabo प्रणालीमध्ये केंद्रस्थानी आहे.

Zabo प्रणालीमध्ये वनभूमीचे संवर्धन करण्यासाठी तलावांच्या वरील १.५ हेक्टर किंवा त्यापेक्षा अधिक जागेमध्ये विविध प्रकारची झाडे लावली जातात. त्यामुळे पावसाळा सुरू झाल्यानंतर जलसंचय करण्याच्या दृष्टीने त्याचा मोठा लाभ होतो असे शेकडो वर्षांच्या अनुभवातून लक्षात आलेले आहे. जलसंग्रह क्षेत्रात तीव्र उतार असेल अशा ठिकाणी झाडे लावली जातात आणि वनभूमीचे संवर्धन केले जाते. डोंगरउतारावरून येणारे पावसाचे पाणी साठवण्यासाठी मातीचे बांध घालून पायथ्याशी विविध प्रकारचे तलाव पारंपरिक पद्धतीने बांधण्यात येतात. साधारणतः दोन मीटर खोल, २४ मीटर लांब आणि १० मीटर रुंद या प्रमाणात छोटे तलाव बांधले जातात.

मोठे तलाव बांधल्यास त्यावरील माती तलावात वाहून जाऊन तलाव उथळ बनण्याचा धोका असतो. त्यामुळे छोटे तलाव बांधण्यावर भर दिला जातो. या प्रणालीमध्ये केवळ ०.२ हेक्टर इतकी जागा पुरेशी ठरते. पावसाच्या पाण्याने वाहणारी माती थोपवणे शक्य बनावे म्हणून खड्डे तयार केलेले असतात. वर्षातून एकदा त्याचीही सफाई करून पावसाळ्यापूर्वी ते सज्ज केले जातात. पावसाळ्यापूर्वी तलावांचे तळही मजबूत केले जातात. त्यामुळे तलावात पाणी जिरण्याचे प्रमाण कमी होते आणि अधिकाधिक पाणी तलावामध्ये साठवणे शक्य होते.

गावांमध्ये गाई-म्हशी ठेवण्यासाठी जसे गोठे असतात त्याप्रमाणे गावातील गायी-म्हशींना ठेवण्यासाठी तलावाच्या खालच्या बाजूला बांबूंचा वापर करून गोठे बांधले जातात. एका गोठ्यामध्ये २५-३० गायी, म्हशी एकत्रित राहू शकतात. या गोठ्यांची देखभाल व निगा राखण्याची जबाबदारी एकेका शेतक-यांवर आलटून पालटून दिली जाते. ही जागा पावसाच्या पाण्यानेच धुतली जाते आणि त्या वेळी जे पाणी वाहून जाते ते वाया जाऊ न देता थेट शेतामध्ये कसे पोहोचेल अशी व्यवस्था केलेली असते. तसेच, तलाव पूर्ण भरल्यानंतर जे पाणी बाहेर वाहते तेसुद्धा या गोठ्यातूनच जाते आणि त्यामुळे शेणमिश्रीत हे पाणी वाहत जाते आणि शेताला जाऊन मिळते. या यंत्रणेमुळे आपोआपण शेताला पोषक खते आणि पाणी हे दोन्हीही मिळते. शेकडो वर्षांपासून ही यंत्रणा विशेष प्रभावी ठरत असल्याचे लक्षात आल्याने या गावातील लोकांनी या प्राचीन परंपरेची कास सोडलेली नाही. शेतातील बांधांवर पाणी रोखण्यासाठी मातीच्या जोडीने चा-याचा वापर केला जातो. शेतातील नांगरणीच्या कामांसाठी बैलांचा वापर केला जातो. शेतात एकाच प्रकारचे धान्य पिकवले जाते. त्यासाठी १८० दिवसांचा कालावधी पुरेसा ठरतो. डोंगरउतारावर मात्र दोन पिके घेतली जातात. शेतीच्या जोडीला येथील बहुतांश शेतकरी मत्स्यपालनही करतात. डोंगरउतारावरील शेतीची वैशिष्ट्यपूर्ण रचना एकदाच केली जाते. या कामामध्ये एकाचवेळी सगळे शेतकरी उतरतात आणि समुदायाने परस्परांना मदत करतात. डोंगरउतार कसा आहे यावर त्या शेतीचे क्षेत्र ठरत असते. अशा ठिकाणी शेती करण्यासाठी तेथील वनसंपत्ती तोडून ती जागा सपाट केली जाते. त्या ठिकाणी माती व लाकडाच्या मदतीने बांध घातले जातात. गावामध्ये जिथे जिथे शेती केली जाते ती याच पद्धतीने केली जाते. पाणी वाया जाऊ द्यायचे नाही या भूमिकेतून Zabo प्रणाली वर्षानुवर्षांपासून स्थानिकांनी अतिशय निगुतीने जपलेली आहे.



कमी पर्जन्यमान असल्याने या गावावर पाण्याचे संकट दरवर्षीचेच असते. पाण्याच्या कमतरतेमुळे सिंचनामध्ये पाण्याचा जराही अपव्यय होऊ नये यासाठी काटेकोर नियम लागू केलेले आहेत. या गावाला दोन नद्या असल्या तरीही Sedju या एकाच नदीचे पाणी सिंचनासाठी वापरले जाते. ही मोसमी नदी असल्याकारणाने या नदीलाही पाणी ठराविक काळापुरते आणि मर्यादितच असते. त्यामुळे पाण्याचे वितरण कसे आणि किती होणार हे अगोदरच ठरवले जाते. जर एखाद्या व्यक्तीने नदीतील पाणी घेण्यासाठी काही व्यवस्था एका ठिकाणी केलेली असेल तर त्याच जागी दुस-या शेतक-याला परवानगी दिली जात नाही. ठराविक अंतर सोडून तो नदीचे पाणी घेऊ शकतो. नदीचे पाणी अधिकाधिक प्रवाही कसे राहील याचे उत्तम नियोजन हा समुदाय करतो. या समुदायातील लोकांना पाण्याचे महत्त्व इतके आहे की रस्त्याच्या कडेला साठलेले पाणीसुद्धा ते वाया जाऊ देत नाहीत. ते पाणीसुद्धा तलावापर्यंत नेण्याची व्यवस्था करून सिंचनासाठी वापरले जाते. रस्त्यावर दर दहा मीटर अंतरावर गावक-यांनी गतीरोधक बनवलेले असून ते पाणी अडवण्याचे काम करतात. हे पाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यापर्यंत पोहोचवले जाते.

गावात राहणा-या लोकांमध्ये कोणी किती पाणी वापरायचे याचे वाटप निश्चित केले जाते आणि गावकरी परस्पर सहमतीने तेवढ्याच पाण्यामध्ये आपल्या गरजा भागवतात. जर गावात नैसर्गिक झरे असतील तर त्यांच्या जपणूक व देखरेखीसाठीही यंत्रणा निर्माण केलेली आहे. शेती करणारा कोणताही शेतकरी दुस-या शेतक-याच्या पाण्यावरील हक्कावर अतिक्रमण करू शकत नाही. तसे त्याने केल्यास तो शिक्षेला व कारवाईला पात्र ठरतो. पाणी वापरणारी गावातील प्रत्येक व्यक्ती पावसाळा संपल्यानंतर गावात पुन्हा पाण्याची गरज लागणारच आहे हे लक्षात घेऊन जलसंचय करण्याचे जे जे मार्ग आहेत त्यांची देखभाल, निगराणी आणि स्वच्छता राखणे या कामांत स्वतःला जुंपून घेतो. शेतीचे पाणी एका शेतातून दुस-या शेतात पोहोचण्याची व्यवस्था असल्याने परस्पर समन्वय व साहचर्य जपत ही शेती केली जाते. या गावात सर्वांनी मिळून उभे केलेले १५० तलाव हीच त्या गावाची खरी समृद्धी आहे. ती वाढवत नेण्यावर गावक-यांचा भर आहे.

आजघडीला पाण्याची समस्या अनेक ठिकाणी तीव्र होत असताना थेंबाथेंबाचे मोल जाणून कृतिशीलतेने जगणारे Kikruma हे गाव आणि Zabo प्रणाली निश्चितपणाने वैशिष्ट्यपूर्ण आणि तितकीच अनुकरणीय ठरणारी आहे. ■■

(पृष्ठ क्रमांक १८ वरून)

मानसिकता वाढीस लागते आहे. कृषी क्षेत्रातही कमी-अधिक फरकाने अशीच परिस्थिती दिसून येते. टाळेबंदी आणि निर्बंधाचा फटका शेतक-यांना आणि कृषिपूरक व्यवसाय करणा-यांनाही बसला आहे. टाळेबंदीच्या काळात विविध शहरांतील बाजारपेठा बंद असल्याने मालाला उठाव न मिळणे, माल पडून राहणे, योग्य बाजारभाव न मिळणे या समस्यांचा सामना या घटकांना करणे भाग पडले. या खेरीज, पिकांसाठी आवश्यक असणारी औषधे, कीटकनाशके मिळण्यातही अनेक अडचणी येत होत्या. या सगळ्याच्या जोडीला पावसाला लहरीपणा होताच. त्यामुळे, विविध कारणांनी शेतीचे नुकसान होत राहिले व त्याचाही परिणाम ग्रामीण भागातील लोकांच्या मानसिकतेवर झालेला आहे.

एकंदरीतच, या सर्व परिस्थितीचा मोठा फटका लोकांच्या मनःस्थितीवर होतो आहे. सततच्या ताणामुळे लोक चिडचिडे होत आहेत. त्यांच्या बोलण्यात नकारात्मकता आता उघडपणे दिसते आहे. या चिंतेने त्रस्त असणारी माणसे स्वतःला सतत सकारात्मक राखण्याच्या प्रयत्नांमध्ये कमी पडत आहेत. वाढत्या तणावांमुळे मानसोपचार तज्ज्ञांकडे किंवा समुपदेशकांकडे जाणा-या लोकांचे प्रमाणही या काळात खूप वाढलेले आहे. एरवी मानसिकदृष्ट्या खंबीर वाटणा-या व्यक्तीसुद्धा या काळामध्ये दीर्घकालीन अनिश्चिततेमुळे खूप खचून गेलेल्या आहेत. साधारणतः २२ ते ५५ या वयोगटातील लोकांमध्ये मानसिक नैराश्याचे प्रमाण अधिक वाढते आहे. वर्तनातील बदल इतरांना सहजतेने जाणवतील अशा पातळीवर आले आहेत. त्यामुळे, अशा परिस्थितीतून जाणा-या लोकांना भक्कम मानसिक आधार देण्याची खूप मोठी गरज निर्माण झालेली आहे. विलंब लागला तरी परिस्थिती आज ना उद्या सामान्य होणार आहे, हा आशावाद लोकांच्या मनात जागवणे गरजेचे आहे. अवघड काळातही सकारात्मक राहायला हवे हा आशावाद जागवता आला तर येणा-या ताणाचा सामना निश्चितपणाने करता येईल असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे सांगणे आहे. ■■

संदर्भ : 1) https://www.bbc.co.uk/newsround/56511514
2) https://www.dhakatribune.com/bangladesh/2021/03/25/bangladesh-set-to-celebrate-independence-day-friday
3) downtoearth.org.in/coverage/in-custody-23432
4) https://www.indiawaterportal.org/articles/zabo-art-impounding-water



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

**अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना**

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

**Gopabandhu Das : Thoughts on Education.**
**Edited by : Basanta Kumar Panda,**
**Translated by : Aditya Nayak,**
**Sikshasandhan, Bhubneswar, 2021,**
**Pages - 103, Price- Rs. 120/-**

'उत्कलमणी' असे गौरवास्पद बिरुद प्रदान झालेले गोपबंधू दास गणले जातात आधुनिक ओदिशाचे शिल्पकार. प्रखर देशभक्त, प्रतिभाशाली असे मनस्वी कवी, अभावग्रस्तांचे तारणहार आणि कर्ते समाजसुधारक असे बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या गोपबंधू दास यांनी प्रसंगोपात्त व्यक्त केलेले त्यांचे शिक्षणविषयक विचार व चिंतन एका छोटेखानी ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे, ही अनेकार्थांनी लक्षणीय बाब ठरते. ओदिशाच्या शैक्षणिक आणि पर्यायाने सामाजिक इतिहासाचा एक अस्सल दस्तऐवज म्हणून या संकलनाचे महत्त्व आगळेवेगळे असेच राहील. ऐन पारतंत्र्यात ओदिशासारख्या तुलनेने अप्रगत प्रांतातील लोकाग्रणींचे त्या काळातील प्रचलीत शैक्षणिक आव्हानांसंदर्भातील आकलन नेमके कसे होते आणि तत्कालीन सर्व प्रकारच्या मर्यादांच्या कुंपणाचा जाच सहन करत असतानाच त्या समस्यांवर तोडगा काढण्याच्या दिशेने त्यांचे चालू असणारे अथक प्रयत्न नेमके कशा प्रकारचे होते, यांवर प्रकाशझोत टाकणारा झरोकाच जणू प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांना उपलब्ध होतो. शिक्षण अर्धवटच सोडाव्या लागलेल्या मुलामुलींना विविध अभ्यासविषयांचा परिचय घडविणारे एक वर्षाच्या कालावधीचे प्रशिक्षण प्रदान करून परिवर्तनाचे शिलेदार या नात्याने ग्रामीण भागांत सक्रिय बनण्यासाठी सक्षम बनविण्यासारखे गोपबंधू दास त्या काळात प्रवर्तित करू पाहत असलेले अभिनव प्रारूप आजही तितकेच प्रस्तुत ठरावे. मातृभाषेमधून केवळ प्राथमिकच नव्हे तर त्यापुढील शिक्षणाचाही आग्रह धरत असतानाच इंग्रजीसारख्या ज्ञानभाषेशी सलगी प्रस्थापित करण्यासंदर्भातील गोपबंधूंचा कटाक्ष आजही अनुकरणीय असाच आहे. एकंदरीतच, एका समाजमनस्क लोकनेत्याचे अनुभवसिद्ध असे शिक्षणविषयक चिंतन या क्षेत्राबद्दल आस्था असणा-या सर्वांनाच रोचक व वाचनीय वाटावे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune,**
**on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**